**मुख्य कार्यालय, विरार**
विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.

वसई-विरार शहर महानगरपालिका
स्थापना : ३ जुलै २००९

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० - २५२५१०७
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./ 
दिनांक : १३/५/२०२०

वाचले :-

१) आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
२) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७.
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, नवीन मंत्रालय मुंबई यांचेकडील कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी निर्गमित केलेली अधिसुचना क्र./करोना२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य५ दि. १४/०३/२०२० नुसार महाराष्ट्र कोविड १९ उपाययोजना नियम २०२०.

---

## आदेश

ज्याअर्थी आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत कोरोना या विषाणूचा संसर्ग बाधीत रुग्ण आढळून येत आहेत. राज्यात ही कोरोना संसर्ग लक्षणीय रित्या वाढत असल्याचे दिसून येत आहे.

आणि ज्याअर्थी कोरोना विषाणूंचा संसर्ग व प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचा संसर्ग असल्यास त्यात अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक असल्याने असे प्रवासी व संशयीत रुग्ण यांना दाखल करण्याकरिता **(Corona Care Centre)** निर्माण करणे आवश्यक आहे.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र. ३ मधील शासन अधिसूचनेनुसार तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र कोव्हिड १९ उपाययोजना नियम, २०२० अन्वये महानगरपालिका, आयुक्त ह्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी व आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी समक्ष प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

आणि ज्याअर्थी उपोद्घातातील अ.क्र. ३ मधील महाराष्ट्र कोव्हिड १९ उपाययोजना नियम, २०२० च्या नियम १०(ए) अन्वये शासकिय किंवा खाजगी इमारत/मत्ता अलगीकरणासाठी आवश्यकतेनूसार नामनिर्देशनाचे अधिकार समक्ष प्राधिकारी यांना देण्यात आलेले आहे.

त्याअर्थी मी श्री. गंगाथरन डी., आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका मला आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व उपोद्घातातील अ.क्र. ३ मधील शासन अधिसूचनेनुसार तयार करण्यात आलेल्या महाराष्ट्र कोव्हिड १९ उपाययोजना नियम, २०२० मधील निर्देशान्वये वसई विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कोव्हिड १९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपोद्घातातील अ.क्र. ३ मधील महाराष्ट्र कोव्हिड १९ उपाययोजना नियम, २०२० चा नियम १० (ए) नुसार प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन खालील विवरणपत्रात नमूद इमारत Corona Care Centre निर्माण करणे करीता अधिग्रहीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | पत्ता |
|---|---|---|
| १. | सेंट. घोन्सालो गार्सिया कॉलेज (G.G. College) | चिमाजी अप्पा मैदानाच्या मागे, कचेरी रोड, वसई पश्चिम, ता.वसई, जि.पालघर. |

मुख्य कार्यालय, विरार
विरार (पूर्व),
ता. वसई, जि. पालघर - ४०१ ३०५.

दूरध्वनी : ०२५० - २५२५१०१ / ०२/०३/०४/०५/०६
फॅक्स : ०२५० - २५२५१०७
ई-मेल: vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क. : व.वि.श.म.
दिनांक :

सदर इमारतीची संपूर्ण आर.सी.सी. इमारत, मजले, साहित्य, लिफ्ट, इलेक्ट्रीक फिटींग इत्यादीसह ताबा अतिरिक्त आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका ह्यांचेकडे तात्काळ देणेत यावा.

उक्त आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास संबंधितांनी टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुध्द आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ मधील ५१ (b), भारतीय साथा रोग नियंत्रण अधिनियम १८९७ व भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) च्या कलम १८८ नुसार दंडनिय/ कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदरचा आदेश आज दि. १३ /०५/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

वसई विरार शहर महानगरपालिका
जि. पालघर

13/5/2020.

(गंगाथरन डी.) भाप्रसे
आयुक्त,
वसई विरार शहर महानगरपालिका

प्रत :-

१) सर्व संबंधित
२) मा. प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार कॉम्पलेक्स बिल्डींग, नवीन मंत्रालय, मुंबई - ४००००१ यांना माहितीसाठी सविनय सादर.
३) मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, नवी मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
४) जिल्हाधिकारी, पालघर यांना माहितीसाठी.
५) पोलीस अधिक्षक, पालघर ह्यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६) अतिरीक्त आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका.
७) उपसंचालक, नगररचना विभाग, वसई विरार शहर महानगरपालिका.
८) प्र.वैद्यकिय आरोग्य अधिकारी, वसई विरार शहर महानगरपालिका यांना माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.